महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२६/सात/सत्रारंभ, दीर्घसुट्टया व सत्रसमाप्ती/ ९५० दिनांक:- 12 JUN 2026

प्रति,

१. कुलसचिव, सर ज.जी.कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय
(डि-नोव्हा अंतर्गत अभिमत विद्यापीठ), मुंबई.

२. अधिष्ठाता/विभागप्रमुख, शासकीय कला परिसंस्था

३. प्राचार्य, शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला परिसंस्था

**विषय:- शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ (पदविका अभ्यासक्रम)**
**सत्रारंभ, दीर्घसुट्टया व सत्रसमाप्ती.**

सोमवार, दि.१५ जून, २०२६ पासून शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ चे पहिले सत्र सुरु होईल. या शैक्षणिक वर्षासाठी दीर्घसुट्टया, सत्रसमाप्ती आणि सत्राचे नियोजन खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) आठवडयातून कमीत कमी एकूण ३० तास शिकविण्यात यावे. दररोज ६ तास याप्रमाणे संस्था प्रत्येक आठवडयात चालू ठेवण्यात यावी.

२) महिन्याच्या प्रत्येक शनिवारी व रविवारी महाविद्यालये बंद राहतील. तसेच महाविद्यालयांची कार्यालये महिन्याच्या पहिल्या, तिस-या व पाचव्या शनिवारी कामकाजाकरिता चालू राहतील.

३) शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये शैक्षणिक कामाचे दिवस १८८ पेक्षा कमी भरणार नाहीत याची संस्था चालकांनी खबरदारी घ्यावी.

४) प्रथम सत्रात १०० व द्वितीय सत्रात ९२ याप्रमाणे एका शैक्षणिक वर्षाचे कामाचे दिवस १९२ गृहित धरुन त्यापैकी ३ स्थानिक सुट्टया देता येतील व अशारीतीने १८९ दिवस अंतिमत: पूर्ण करणे आवश्यक राहील.

५) या शैक्षणिक वर्षात सत्रारंभ, दीर्घसुट्टया आणि सत्रसमाप्ती खालीलप्रमाणे राहील.

| शैक्षणिक सत्र व दीर्घसुट्टया | आरंभ दिवस | समाप्ती दिवस | एकूण कामाचे दिवस |
|---|---|---|---|
| प्रथम सत्र | सोमवार, दि.१५ जून,२०२६ | ते सोमवार दि. ३० ऑक्टोबर, २०२६ | १०० |
| दिवाळी सुट्टी | शनिवार, दि.७ नोव्हेंबर २०२६ | ते रविवार दि. १५ नोव्हेंबर २०२६ | |
| द्वितीय सत्र | सोमवार, दि.१६ नोव्हेंबर,२०२६ | ते बुधवार दि. ३१ मार्च,२०२७ | ९२ |
| | | **एकूण** | **१९२** |
| | | वजा स्थानिक सुट्टया | ३ |
| | | **एकूण कामाचे दिवस** | **१८९** |

६)	वरीलप्रमाणे दि.३१.३.२०२७ पर्यंत शैक्षणिक वर्षाचे द्वितीय सत्र,शैक्षणिक कामकाज पूर्ण करण्यात यावे. **तथापि, दि.१ एप्रिल ते ३० एप्रिल,२०२७ या कालावधीत महाविद्यालयाच्या अंतर्गत परीक्षेचे निकाल तयार करणे, शैक्षणिक वर्षाचे कामकाजाचे नियोजन करणे, उच्च कला परीक्षेचे कामकाज करणे, नवीन शैक्षणिक वर्षात शिकविण्यासाठी विषयाची पूर्वतयारी करण्याकरिता तसेच प्राचार्यांनी सोपविलेली इतर तद्नुषंगिक कामे करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी महाविद्यालयाचे कार्यालय चालू ठेवण्यात यावे.** दि. १ मे, २०२७ रोजी महाराष्ट्र दिन साजरा करुन उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना उन्हाळी सुट्टी दि. २ मे, २०२७ पासून पुढे अनुज्ञेय राहील. तसेच शासनाने जाहीर केलेल्या सर्व सार्वजनिक सुट्टयांचे दिवशी कला महाविद्यालये बंद ठेवण्यात यावीत. याशिवाय उपरोक्त बंधन पाळून शासनमान्य अशासकीय कला परिसंस्थांच्या प्रमुखांना दोन्ही सत्र मिळून एकूण ३ दिवसांची स्थानिक सुट्टी "कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांची पूर्वमंजूरी घेऊन जाहीर करता येईल.

७) तृतीय वर्ष (ऍडव्हान्स) आणि अंतिम वर्ष/पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमासाठी विहित नियमः-

१)	कला परिसंस्थेतून इंटरमिजिएट व ऍडव्हान्स - रेखाकला व रंगकला, उपयोजित कला, शिल्पकला व प्रतिमानबंध वर्गात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ऍडव्हान्स व डिप्लोमाच्या वर्गात प्रवेश देण्याची कार्यवाही पूर्ण करून दि. १५.०६.२०२६ पासून सदर अभ्यासक्रमाचे पहिले सत्र सुरू राहील.

२)	शैक्षणिक वर्ष अखेरीस जे विद्यार्थी आवश्यक उपस्थिती व वर्गकामाची पूर्तता करणार नाहीत त्यांची नांवे परीक्षेतून वगळण्यासाठी (Withdrawal) कळविण्याची जबाबदारी अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत,

निवड नस्ती